प्रकरण : २

## संशोधन विषयीच्या साहित्याचा आढावा.


२.१ संबंधित साहित्याचा आढावा.

२.२ सराव पाठासंबंधी संशोधन [ भारतातील ]

२.३ पाठ नियोजना संबंधी संशोधन [ भारतातील ]

२.४ पाठ नियोजन विषयक संशोधन [ परदेशातील ]

२.५ नियोजन व वर्ग वर्तनावरील संशोधन [ परदेशातील ]

२.६ महत्वाचे निष्कर्ष.

## :: प्रकरण २ रे ::

## संशोधन विषयीच्या साहित्याचा आढावा

### २.१ संबधित साहित्याचा आढावा :-

संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा घेणे ही संशोधनाची पहिली आणि महत्वाची पायरी आहे. आढावा घेण्याची प्रक्रिया सातत्याने चालूच असते. संशोधन करीत असताना ज्या वेळी अडचणी येतात त्यावेळी संबंधीत साहित्याच्या इतिहासाच्या अभ्यासाने सुटण्यास मदत होते. प्रस्तुत संशोधन पाठ नियोजनाची व सराव पाठाशी संबंधीत आहे.

" पाठ नियोजन करीत असताना विद्यार्थी-शिक्षकामध्ये चालू असणा-या विचार प्रक्रियांचा शोध "

या विषयावर स्वतंत्र असे संशोधन झालेले नाही म्हणून भारतात व परदेशात याच्याशी संबंधित विषयावर जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा या प्रकरणांत घेतला असून तो खालील घटकांच्या संदर्भात घेतला आहे.

१] सराव पाठा संबंधी संशोधन -
२] पाठ नियोजनाविषयी संशोधन -
३] शिक्षक विचार प्रक्रिये संबंधी संशोधन-
४] नियोजन व वर्ग वर्तना संबंधी संशोधन -
५] प्रकट विचार विषयी संशोधन -

## २.१ सराव पाठासंबंधी संशोधन [ भारतातील ]

भारता मध्ये सराव पाठा संबंधी फारच थोडे संशोधन झाले आहे

द्वेव एस् के [ १९७९ ] यांनी वर्गाध्यापनातील गणित विषयाच्या अध्यापन तत्याबाबत संशोधण केले आहे. यासाठी त्यांनी नागालँड मधील बारा ग्रामीण व आठ शहरी शाळांमधील ४९ शिक्षकांच्या अध्यापन निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढले. (9)

१] बहुतांशी शिक्षकांनी व्याख्यान पध्दतीचा अवलंब केला.

२] बहुतांशी शिक्षकांचा प्रतिध्वनित प्रश्नाबाबत नकारात्मक दृष्टीकोन दिसून आला.

३] बहुतांशी शिक्षकांच्या अध्यापनात पाठातील पाय-या--मध्ये स्पष्टीकरणाबाबत तार्किक संघटन दिसून येत नाही.

४] पाठातील संबोधाचे विद्यार्थ्यांना आकलन झाले की नाहीत या बाबत बहुंतांशी शिक्षक निरुत्साही दिसेल.

जी. सी. पी. आय. [ अलाहाबाद १९७६ ] येथे मूल्यमापनाच्या प्रश्नांच्या सहाय्याने अध्यापनातील उदिष्टे किती प्रमाणात साध्य झाली तसेच मूल्यमापनचे स्वरुप यावर संशोधन केले त्याचे निष्कर्ष खालील प्रमाणे - (9)

१] मूल्यमापनामध्ये ज्ञानात्मक उद्दिष्टांवर आधारित असे जास्त प्रश्न काढलेले आढळले.

२] मूल्यमापनामध्ये उपयोजनात्मक उद्दिष्टांवर आधारित प्रश्न अत्यंत कमी काढलेले आढळले.

३] कौशल्यावर आधारीत प्रश्नांची संख्या विज्ञान पाठात जास्त आढळली.

४] वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या गणित पाठांत जास्त होती.

सिंग-जी [ १९८२ ] यांनी अध्यापनावर अध्यापन कौशल्याचा सरावाचा कोणता परिणाम होतो त्याचा अभ्यास केला, त्याचे निष्कर्ष खालील प्रमाणे :-

(2)

१] दैनंदिन अध्यापनात अध्यापन कौशल्यांच्या सरावा-मुळे लक्षणीय सुधारणा होते.

२] तसेच अध्यापनात सुधारणा घडवून आणण्याची सूक्ष्म अध्या--पन निश्चितच परिणामकारक आहे.

जोशी ए. एन् [ १९८४ ] यांनी अध्यापन कार्यक्रमातील नियोजन आणि सराव यांचा संबंध शोधला आहे. त्यांनी ५३ विद्यार्थ्यांच्या अध्यापन वर्तनांत पाठ टाचणातील नमूद केलेले किती वर्तन आहे, याची तुलना केली आहे. त्यामध्ये खालील निष्कर्ष सापडले आहेत.

१] पूर्णत: सरावात रूपांतरीत करण्यात आलेले नियोजन आणि सराव यांचा घनिष्ठ संबंध आहे.

(2)

पवार एस. आर. [ १९८७ ] यांनी नियोजन आणि प्रत्यक्ष कौशल्य यात संबंध दिसून येत नाही. असे प्रतिपादिले आहे.

## २.३ पाठनियोजना संबंधी संशोधन [ भारतातील ]

सप्रे निलिमा रविंद्र [ १९९१ ] यांनी आपल्या डॉक्टरेटच्या प्रबंधात खालील निष्कर्ष पाठ नियोजनावर काढले आहेत.

१] नियोजनावर प्रभुत्व प्रशिक्षण दिल्याने सर्व साधारण अध्यापन वर्तन सुधारण्यावर चांगला परिणाम होतो.

२] वाचनाच्या मुक्त कौशल्याचे संदर्भात नियोजनावर प्रभुत्व प्रशिक्षण दिल्याने एकूणच प्रगतीला मदत होते.

३] सूक्ष्म अध्यापन कौशल्यावर प्रभुत्व मिळविणे हे कौशल्य - प्राप्ती साठी अधिक फायदेशीर आहे.

(3)

सुरवसे एम. पी. [ १९९० ] यांनी एम्. फिल साठी सादर केलेल्या प्रबंधात खालील निष्कर्ष नियोजन व सराव या संबंधी मांडलेले आहेत.

१] पारंपारिक प्रशिक्षणापेक्षा नियोजनाचे कृतिसत्रा पेक्षा - नियोजन क्षमते मध्ये प्रभुत्व पातळी साठी दिलेल्या प्रशिक्षणामुळे विद्यार्थी-शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेत लक्षणीय वाढ होते.

२] पारंपारिक प्रशिक्षण पध्दतीमुळे [ सराव ] विद्यार्थी - शिक्षकाच्या अध्यापनावर लक्षणीय परिणाम होतो.

पाटील बा. ना. [ १९८८ ] यांनी नियोजन आणि [ मुक्त प्रश्न] कौशल्य क्षमता या मध्ये सहसंबंध दिसून येतो असे प्रतिपादले आहे.

(3)

किरकिरे पी. एस्. [ १९८१ ] यांनी उद्दिष्टांवर आधारीत पाठ - नियोजनाच्या सहाय्याने अध्यापना नंतर विद्यार्थ्यांची प्रगती कितपत होते, यावर संशोधन केले त्यामध्ये त्यांना असे आढळून आले की १] या पध्दतीने प्रशिक्षणार्थींची प्रगती फारशी समाधान कारक दिसून येत नाही. तसेच २] उद्दिष्टांची पध्दतशीर मांडणी करून पाठ नियोजन केल्यास समाधान - कारक निष्कर्ष प्राप्त होतात.

२.४. आतापर्यंत पाठ नियोजन व सरावा बाबत भारतात झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला. परदेशाच्या मानाने भारतात फारच कमी संशोधन झालेले आहे. परदेशात खूपच संशोधन झालेले दिसून येते.

क्लार्क आणि यिंगर [ १९७९ ब ] यांनी लेखना संबंधी पाठनियोजना विषयी संशोधन केले असता पुढील निष्कर्ष मिळाले.

१] सर्व समावेशक पाठ नियोजन.

२] विकासात्मक पाठ नियोजन.

4

क्लार्क, मार्क्स आणि पीटर सन [ १९७८ ] यांनी संशोधनात केलेले खालील निष्कर्ष दिसून आले.

१] पाठनियोजनाचा मोठा भाग विषयांशावर असतो.

२] शिकविण्याच्या पध्दती व कृति यावर खूपच कमी विचार होतो.

३] नियोजनाचा अगदी कमी भाग हा उद्दिष्टांवर असतो.

सारखो [ १९८२ ] यांनी चार कनिष्ठ माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या निरीक्षणावरुन असा निष्कर्ष काढला -

4

१] कमी अनुभव असणारे शिक्षक टायलरचे ऐकरेषीय प्रतिमान वापरतात.

२] विषयांशासंबंधी निर्णय नियोजनात प्रथम घेतला जातो, त्यानंतर अध्ययन आणि उद्दिष्टे यांचा निर्णय घेतला जातो.

टायलर राल्फ [ १९७० ] यांनी २६१ माध्यमिक ब्रिटीश शिक्षकांवर संशोधन केले असता त्यांना खालील निष्कर्षआढळून आले.

१] नियोजनाचा मुख्य भर हा विद्यार्थ्याची गरज क्षमता आणि आवड त्यानंतर विषयांश त्यानंतर ध्येये व शेवटी अध्यापन पध्दती यावर असतो.

झाओरिक [ १९७५ ] यांनी १९४ प्राथमिक शिक्षकांवर नियोजनासंबंधी संशोधन केले तेव्हा त्यांना असे आढळून आले की -

१] विषयांशा संबंधीचे निर्णय नियोजनात प्रथम घेतले जातात. आणि त्यानंतर अध्ययन व शेवटी ध्येया संबंधी निर्णय घेतले जातात.

(5)

क्लार्क आणि यिंगर [ १९७६ ] यांनी प्राथमिक शिक्षकांचा नियोजनाचा अभ्यास केला तेव्हा त्यांना असे आढळून आले की -

१] शिक्षकांना दैनंदिन पाठ नियोजनापासून वार्षिक नियोजना पर्यंत आठ प्रकारची नियोजने करावी लागतात.

२] पाठ नियोजनामुळे शिक्षकांच्या मानसिक गरजा पूर्ण होतात व तो बौध्दिक दृष्टया अध्यापनास सज्ज होतो.

२.५ नियोजन व वर्ग वर्तनावरील संशोधन [ परदेशातील ]

पिटर सनने [ १९७८ ] असा निष्कर्ष काढला आहे की, (5)

१] नियोजन करणा-या शिक्षकांचा अभिवृत्ती गुणांक जास्त असतो.

२] पाठनियोजन करताना शिक्षक विषय ज्ञानावर जास्त वेळ खर्च करतात.

३] पाठनियोजन वर्तन व अध्यापन वर्तन आंतर क्रिया यामध्ये धन सहसंबंध असतो.

मोरीन - दर्शिमर [ १९७७ ] बहुसंख्य अनुभवी शिक्षकांचे नियोजन हे कागदावर लिखित स्वरूपा ऐवजी मानसिक असते.

क्लार्क आणि येलमोरे [ १९७९ ] यांना पाच शिक्षकांच्या निरिक्षणावरून आढळून आले की, वर्षाच्या नियोजनाचे पहिले पाच आठवडे शिक्षकाला भौतिक वर्ग वातावरण निर्मितीसाठी खर्च करावे लागतात. विद्यार्थी क्षमता पडताळून पहाणे, व वर्गात सामाजिक वातावरण निर्माण करण्यासाठी नियोजन उपयोगी पडते.

बर्नेट [ १९७७ ] यांचा निष्कर्ष नियोजन आणि सराव यांच्याशी निगडीत आहे.

शॉव्हेल सन [ १९७६ ] यांनी अध्यापनाच्या नियोजना बाबत पुढील कल्पना मांडली आहे.

१] एखादा घटक शिकविताना घटकाची उद्दिष्टे निश्चित करणे.

२] ज्या परिस्थित शिकवावयाचे आहे, त्या परिस्थितीला आपल्या नियंत्रणा खाली असणारे व नसणारे घटक यांचा विचार करणे.

३] त्या विशिष्ट परिस्थितीत एखाद्या कृतिची काय निष्पत्ती होईल त्या निष्पत्तीचा उद्दिष्ट साधण्यासाठी काय उपयोग होईल याचा विचार करणे.

४] त्या निष्पत्तीची उपयुक्तता विचारात घेऊन योग्य अध्यापन-कृतिंची निवड करणे.

झाओरिक [ १९७० ] पिटरसन क्लार्क आणि क्लार्क [ १९७८ ] कार्नव्हेन - [ १९८० ] यांना असे आढळून आले की पाठ नियोजन आणि अध्यापन यांच्यात धनसहसंबंध आहे.

एक रेषीय प्रतिमान हे राल्फ टायलर [ १९५० ] यांनी संशोधन करून मांडले.

त्यामध्ये त्यांनी पुढे दिलेल्या पाय-यांचा समावेश होतो.

१] अध्ययन कृतिची निवड २] अध्ययन कृतिंचे संघटन ३] मूल्यमापन-प्रक्रिया. लिनिअर मॉडेलचा समावेश शैक्षणिक नियोजनाच्या सर्व स्तरांवर करावा असे मान्य झाले आहे.

बॉब विल्सन [ १९८७ ] यांनी पाठ नियोजनाचे फायदे, पाठनियोजनाची पध्दत पाठनियोजनाचे नमुने, अध्ययन कार्यक्रम व पाठ नियोजनाचे मूल्यमापन यावर अभ्यास करून पुढील निष्कर्ष काढले.

१] योग्य पाठ नियोजनामुळे विद्यार्थी-शिक्षकांची अध्यापन क्षमता वाढते. आणि वेळेचा परिणामकारक उपयोग होतो.

२] घटक व कौशल्यानुसार पाठ नियोजनाचे नमुने विविध त-हेने काढता येतात.

३] पाठनियोजनामुळे विद्यार्थी-शिक्षक किती प्रमाणात कार्यक्षम आहेत हे समजते.

४] पाठ नियोजनाचे स्वयंमूल्यमापन करून विद्यार्थी शिक्षक स्वत: किती प्रमाणात यशस्वी होतो ते कळते.

५] उद्दिष्टे, अध्यापन पध्दती तंत्र, युक्ती, अध्ययन कार्यक्रम यासाठी अध्ययन प्र परिणाम कारक होण्याचे पाठ नियोजन हे साधन आहे.

ग्रॉव्हेल सन [ १९८५ ] यांनी खालील निष्कर्ष काढले.

१] अध्यापनाचा आराखडा शिक्षकाला संहिते सारखा उपयोगी पडतो.

२] अध्यापकाचे नियोजन हे प्रामुख्याने एखादी तारीख, महिना, सत्र किंवा शैक्षणिक वर्ष या विविध कालावधीत करावयाच्या कृतिशी निगडीत असते.

या कृतिविषयी शिक्षकाने घेतलेल्या निर्णयाचा मोठा परिणाम त्याच्या वर्ग वर्तनावर होत असतो.

मोरीन-दर्शिनर आणि व्हॅलेन्स [ १९७६ ] यांना असे आढळून आले की -

१] शिक्षकाचे संपूर्ण नियोजन हे त्याच्या निवेदनात प्रतिबिंबित होते.

२] नियोजनामध्ये वर्तनाची ध्येये, विद्यार्थ्यांच्या गरजांचे निदान, मूल्यमापन व पर्यायी शिक्षक कृति या संबंधी कमी विचार केला जातो.

निष्कर्ष

आतापर्यंत आपण पाठनियोजन व सराव या बाबत परदेशात व भारतात झालेले संशोधन यांचा आढावा घेता महत्वाचे निष्कर्ष खालील प्रमाणे दिसून येतात.

१] नियोजनाच्या विविध कृतिंचा मानसिक आराखडा तयार होतो.

२] विशिष्ट परिस्थितीत [ वर्गाध्यापनांत ] करावयाच्या कृतिंचा क्रम व निर्णयांचा सुस्पष्ट मानसिक आराखडा पाठनियोजनामुळे स्पष्ट होतो.

३] शिक्षकांना दैनंदिन पाठापासून अनेक प्रकारची नियोजने करावी लागतात.

४] बहुतांशी शिक्षकांच्या अध्यापनात पाठातील पाय-यांमध्ये स्पष्टीकरणाबाबत तार्किक संघटन दिसून येत नाही.

५] पूर्णत: सरावात रूपांतरीत करण्यात आलेले नियोजन आणि सराव यांच्यात घनिष्ठ संबंध आहे.

६] उद्दिष्टांची पध्दतशीर मांडणी करून पाठ नियोजन केल्यास योग्य निष्कर्ष मिळतात.

७] अध्यापन परिणाम कारक होण्यासाठी नियोजनाची गरज असते.

८] अध्यापनाचा आराखडा शिक्षकांना संहिते सारखा उपयोगी पडतो.

९] चांगले पाठ नियोजन केल्यामुळे विद्यार्थी-शिक्षकांची अध्यापन क्षमता वाढून वेळेचा सुदुपयोग होतो.

१०] नियोजन आणि सराव यांचा घनिष्ठ संबंध आहे.

या आढाव्या वरुन असे दिसून येते की, नियोजन व विचार प्रक्रिया यावर संशोधन फारच कमी झाले आहे. त्या साठी या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे प्रकटविचार हे तंत्र ही नविन असून परदेशात त्यावर थोडेच संशोधन झाले आहे. भारतात अशा प्रकारचे संशोधन अदयापही झालेले नाही. म्हणून संशोधिकेने हया विषयावर संशोधन करावयाचे ठरविले आहे.